**नि.क्र.३१**

**<u>साक्षीदार क्र.०३ चा पुढील सरतपास अभियोग पक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्री.जी.आर.माजगावकर यांचे मार्फत –</u>**

**०१.** मी चिदानंद म्हेत्रे यास पाहिल्यास ओळखु शकतो. आज तो न्यायालयात हजर आहे. (साक्षीदाराने न्यायदान कक्षात मागे बाकावर बसलेल्या आरोपीकडे दिशा निर्देश केला).

**सरतपास पूर्ण.**

**<u>आरोपी तर्फे उलटतपास सन्माननीय वकील श्री.ए.ए.शेख यांचे मार्फत –</u>**

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, कथीत अपघात स्थळ हे मुंबई-गोवा हायवेवर सिध्दीविनायक सुपर मार्केटच्या समोर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर हायवे चारपदरी आहे. दोन लेन मुंबईच्या दिशेने जातात व दोन लेन गोव्याचे दिशेने जातात. हे म्हणणे खरे आहे की, मुंबईच्या दिशेने जाणा-या लेनच्या डाव्या बाजुला साईडपट्टी आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाजवळ हायवेला हलकेसे वळण व चढ आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाजवळ एक पेट्रोल पंप व टायर दुरूस्ती हवा भरण्याचे दुकान आहे.

**०३.** मी एस.एस.पी.एम. हॉस्पीटलमध्ये कामाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी गेली ३० वर्षे सिंधुदूर्ग जिल्ह्याचे खासदार श्री. नारायणराव राणे यांचेकडे काम करतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे माझे अनेक वेळेला पोलीस ठाण्यात कामानिमित्त जाणे-येणे आहे व माझी पोलीसांशी चांगली ओळख आहे.

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २०/०१/२०२४ रोजी मी व माझी पत्नी माइ-या बुलेटवरून गॅस सिलेंडर भरण्यासाठी जात होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी गाडी चालवत होतो व गॅस सिलेंडर माइ-या व माइ-या पत्नीच्या मध्ये ठेवले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी एक दुचाकीस्वार रॉंग साईडने कसाल कडुन सावंतवाडीच्या दिशेने येत होता. हे म्हणणे खरे नाही की, तो समोरून अचानक आडवा आल्याने माझी दुचाकी रस्त्याखाली उतरली. हे म्हणणे खरे नाही की, माझी गाडी रस्त्यावरून खाली उतरल्याने माइ-या गाडीचा तोल जावुन मी व माझी पत्नी रस्त्यावर पडलो. हे म्हणणे खरे नाही की, मी

माइ-या चुकीमुळे पडुन मला व माइ-या पत्नीला दुखापत झाली. हे म्हणणे खरे नाही की, सदर अपघाताशी व आमच्या दोघांच्या दुखापतीशी आरोपीचा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, माइ-या म्हणण्याप्रमाणे अपघात दिनांक २१ जानेवारी, २०२४ रोजी घडला व त्याची दखल दिनांक १० फेब्रवारी, २०२४ रोजी घेण्यात आली. माझी पत्नी दवाखान्यात दाखल असल्याने मला फिर्याद देण्यास उशीर झाला. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद देण्यास उशीर झाल्याबाबतचे कारण मी पोलीसांना दिलेल्या जबाबात नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा या अपघातशी कोणातही संबंध नसतांना केवळ माझी लोकांशी ओळख असल्याने आरोपीविरूध्द खोटा नोंदविण्यास लावला. हे म्हणणे खरे नाही की, माइ-या सरतपासातील संपुर्ण मजुकर चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास –** नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by AVADHUT GAJANAN DESHINGKAR
Date: 2026.05.04 13:31:03 +0530

ठिकाण :– ओरोस
दिनांक :– ०४/०५/२०२६.

**( ए.जी.देशिंगकर )**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग–ओरोस.